
# १. गरजाधिष्ठित उपक्रम

## (१) संस्कृती आणि कार्यजगताची ओळख

### १.१ वर्गसुशोभन




### माझी कृती

रांगोळी

पानांची नक्षी

- गट करून कामाचे वाटप करावे. स्वच्छता राखावी. प्रत्येकाला वर्ग सुशोभनाची संधी द्यावी.
- रिकाम्या जागेमध्ये रांगोळी आणि पानांची नक्षी काढण्यास सांगावे.

## १.२ दिनविशेष




**एक, दोन, तीन, चार, झाडे लावा फार फार.**
**पाच, सहा, सात, आठ करू भूमीची हिरवी पाठ.**

### माझी कृती

| | | | |
|---|---|---|---|
| ११ एप्रिल महात्मा फुले जयंती | | २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती | |
| ५ सप्टेंबर शिक्षक दिन | | १४ नोव्हेंबर बालदिन | |

- सामूहिक किंवा वर्गपातळीवर दिनविशेष साजरे करावेत.
- आपल्या शाळेत साजरे केले जाणारे दिनविशेष (नावे) रिकाम्या चौकटीत लिहा.

## १.३ कार्यजगत




### माझी कृती

**वरील व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याची चित्रे काढा.**

- परिसरातील छोट्या उद्योगांची ओळख करून द्यावी.

## १.४ परिसरातील उद्योगांची ओळख








- चित्रांतील उद्योगांसंबंधी माहिती द्यावी. उदा,. हातमाग,यंत्रमाग, वर्तमानपत्र विक्रेता,फळ विक्रेता, पापड लोणचे उद्योग, हारफुले विक्रेता, मातकाम, शिवणकाम, चावी तयार करणारे इत्यादी.

## (२) जलसाक्षरता




### पाऊस

सो सो सो सो, वारा आला
धो धो धो धो, पाऊस झाला
भिजले डोंगर, भिजले रान
मोराचा पिसारा, फुलला छान
धो धो धो धो, पाऊस झाला
नदीनाल्यांना, पूर आला
अंगणात साचले पाण्याचे तळे
कागदाची होडी पाण्यावर पळे
मुलांचा खेळ रंगात आला
धो धो धो धो, पाऊस झाला

— उत्तम सदाकाळ

- पाऊस पडत असताना काय काय घडते याचे निरीक्षण करावयास सांगावे.
- निरीक्षणानुसार गीताच्या ओळी वाढवण्यास हरकत नाही.

## २.१ चित्रकथा/चित्रवाचन




## माझी कृती


**रंग भरा.**

# पाणी म्हणजे जीवन


◆ चित्रवाचन करून पाणी व त्याचे उपयोग यांविषयी माहिती द्यावी. पाण्याविषयी गोष्ट सांगावी.

## २.२ पाणी साठवण







## माझी कृती

### पाणी घेण्याची पद्धत






**योग्य कृती साठी ✓ अशी आणि अयोग्य कृती साठी ✗ अशी खूण करावी.**


◆ पाणी साठवण कशी केली जाते, तसेच पाण्याचा योग्य वापर कसा करावा हे सांगावे.

## ३. आपत्ती व्यवस्थापन

### नैसर्गिक घडामोडी









### माझी कृती

**जमीन, पाणी, डोंगर, वृक्षवेली, पशुपक्षी, मानव, सूर्य, चंद्र, तारे, आकाश, वाळवंट यांपैकी कोणतेही घटक निवडून चित्र काढा व रंगवा.**

◆ नैसर्गिक घटकांची आणि घडामोडींची ओळख करून द्यावी.

3Z2MWB